# वसई विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

### श्वान नसबंदी शस्त्रक्रिया व रेबीज लसीकरणाबाबत

प्राणी जन्म नियंत्रण (श्वान) २००१ नियम, प्राणी कायदा क्रौर्य प्रतिबंधक कलम ३८, पोट कलम (१) भटक्या आणि मोकाट श्वानांना पकडणाऱ्या श्वान पथकाची माहिती.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत श्वान नसबंदी शस्त्रक्रिया व रेबीज लसीकरणाचे कामकाज "प्राणी जन्म नियंत्रण (श्वान) कायदा २००१" नुसार चालते. त्यानुसार भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि रेबीज लसीकरण केले जाते. भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी करण्यात आलेली आहे. हे समजण्यासाठी त्यांच्या डाव्या कानाचा बाह्यकर्णाच्या पुढे आलेल्या भागाचा किंचित "V" आकारचा भाग कापण्यात येतो. तद्नंतर ७ दिवसांनी श्वान ज्या ठिकाणाहून पकडले गेले आहे, त्या ठिकाणी परत नेऊन सोडण्यात येते. वसई विरार शहर महानगरपालिकाच्या स्वान पथकात खालील कारवाई करणेस विनंती किंवा जबरदस्ती करु नये.

१. स्तन पान करणाऱ्या माता व त्यांच्या पिल्लांना उचलणे.

२. ६ महिन्या खालील पिल्लांना उचलणे.

३. नसबंदी केलेल्या श्वानांना उचलणे.

४. एका जागेवरील श्वान नवीन जागेवर सोडणे.

५. भटक्या आणि मोकाट श्वानांना हद्दपार करणे.

६. श्वान भुंकत आहे, आवाज करीत आहेत, झोप मोड होत आहे. या तक्रारी नसून भटक्या व मोकाट श्वानांनाची नैसर्गिक प्रवृत्ती आहेत.

तरी, आपली तक्रार आल्यानंतर ७ दिवसांच्या आत संबंधित कार्यालयाकडील श्वान बंदोबस्त विभागाकडून पाहणी करुन प्राणी जन्म नियंत्रण (श्वान) २००१ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल,

कृपया आपली तक्रार टोल फ्री क्र. 1800-233-0311 येथे नोंदवावी.

(जितेंद्र नाईक)
प्र. सहा. आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका